

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ५९ • बुधवार दि.२५ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

कोर्टाबाहेर भरदिवसा गोळीबार अन् कोयत्याने प्राणघातक वार

पुण्यातील घटना,विरोधकांकडून सरकारवर टीकेची झोड;सात हल्लेखोरांचा थरार

पुणे:पुण्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, शिवाजीनगर न्यायालयाच्या परिसरात भरदिवसा गोळीबार करून आणि कोयत्याने सपासप वार करत मंदार मारुती किवळे याच्या निर्घृण हत्येचा प्रयत्न करण्यात आला. त्याची प्रकृती गंभीर असून पुढील ७२ तास काहीही सांगता येत नाही अशी माहिती ससुन रुग्णालयाच्या अधिष्ठाता जाधव यांनी दिली. न्यायालयासारख्या अतिसंवेदनशील ठिकाणी पोलीस बंदोबस्त असतानाही सात हल्लेखोरांनी हा थरार घडवून आणल्याने पुण्यासह राज्यात खळबळ उडाली आहे. या घटनेवरून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्यांनी राज्य सरकार आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

पुण्यातील शिवाजीनगर न्यायालयाच्या गेट क्रमांक चारजवळ आज बुधवार दि.२५ नोव्हेंबर रोजी मेट्रो स्टेशन परिसरात आणि न्यायालयातील चेंबर क्रमांक ६३ बाहेर ही घटना घडली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, सात हल्लेखोर दोन दुचाकींवरून घटनास्थळी आले होते. त्यांच्यापैकी एकाकडे रिव्हॉल्व्हर, तर दोघांकडे कोयते होते. हल्लेखोरांनी प्रथम मंदार किवळे याच्यावर गोळीबार केला. गोळी चुकल्यानंतर त्याचा पाठलाग करून त्याला पकडण्यात आले



आणि कोयत्याने सपासप वार करण्यात आले. या हल्ल्यात त्याचे दोन्ही हात गंभीर जखमी झाले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या किवळे याला पोलिसांनी तातडीने रुग्णालयात दाखल केले. हल्ल्यानंतर आरोपी दोन दुचाकींवरून घटनास्थळावरून पसार झाले. भरदिवसा न्यायालयाच्या परिसरात झालेल्या या हल्ल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखेचे अधिकारी आणि पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळावरून पुरावे गोळा केले असून, हल्लेखोरांचा शोध सुरू आहे.

कायद्याचा धाक उरला नाही-विजय वडेट्टीवार

पुण्यातील गुंडगिरीने आता सर्व मर्यादा ओलांडल्या असून, कोयता गँगच्या दहशतीनंतर आता थेट न्यायालयाच्या दारात गोळीबार आणि कोयत्याने हल्ले होत आहेत. गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरलेला नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याचा आरोप काँग्रेसचे आ.विजय वडेट्टीवार यांनी केला. गृहमंत्र्यांच्या भाषणांत कायदा-सुव्यवस्थेचे गोडवे गायले जातात आणि आकडेवारी चांगली दाखवली जाते; मात्र प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी आहे. प्रत्येक घटनेनंतर चौकशीचे आदेश आणि कारवाईची आश्वासने देऊन सरकारची जबाबदारी संपत नाही. या घटनेची जबाबदारी कोण घेणार? पोलीस यंत्रणेच्या भूमिकेची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही वडेट्टीवार यांनी केली.

सुप्रिया सुळे यांचा संतप्त सवाल

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खा.सुप्रिया सुळे यांनीही या घटनेवर तीव्र *पान ४ वर*

४२ लाख शेतकऱ्यांना मोफत धान्य;विद्यार्थ्यांच्या भत्त्यातही वाढ!

राज्य मंत्रिमंडळाचे १३ महत्त्वपूर्ण निर्णय; आर्थिक फसवणूक करणाऱ्यांसाठी कठोर कायदा

मुंबई/प्रतिनिधी-राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत शेतकरी, विद्यार्थी, शिक्षक, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे १३ महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील ३३ जिल्ह्यांतील ४२ लाख ३० हजार ७८३ शेतकऱ्यांना पुढील तीन महिने दरमहा प्रतिव्यक्ती पाच किलो मोफत धान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये तीन किलो तांदूळ आणि दोन किलो गव्हाचा समावेश आहे.

आर्थिक फसवणूक करणाऱ्या संस्थांच्या मालमत्ता जप्तीची प्रक्रिया वेगवान करण्यासाठी स्वतंत्र एमपीआयडी न्यायाधिकरण स्थापन करण्यात येणार असून, प्रकरणे ९० दिवसांत निकाली काढण्याची तरतूद केली जाणार आहे. नंदुरबार जिल्ह्यातील नर्मदा-तापी वळण योजनेसाठी ५ हजार ५४८ कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी देण्यात आली असून, यामुळे २६ हजार ५२६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यात वाढ, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आर्थिक सुविधा आणि खासगी अनुदानित शाळांच्या नियमनासाठी स्वतंत्र कायदा करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. खासगी अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयांतील ग्रंथपालांना सातवा वेतन आयोग लागू करण्याचाही निर्णय झाला. याशिवाय महसूल न्यायालयांचे डिजिटल व्यवस्थापन, मुद्रांक अधिनियमात सुधारणा, विद्यापीठ अधिनियमांत एकसमानता, माथाडी व सुरक्षा रक्षक कायद्यात सुधारणा आणि महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमात बदल करण्यास मान्यता *पान ४ वर*



शहरातील शासकीय विश्रामगृहात नांदेड जिल्हा संस्था चालक संघटनेच्यावतीने संस्था चालकांच्या विविध विषया संदर्भात बैठक पार पडली. या बैठकीला माजी मंत्री डी.पी.सावंत, दिलीप पाटील बोटमोगरेकर, प्रविण पाटील चिखलीकर, शिवराज पाटील होटाळकर, कैलाश देशमुख गोरठेकर यांच्यासह अन्य संस्था चालक उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा दर्जा आणि पातळी घसरली-लक्ष्मण हाके

पवार कुटुंबाच्या राजकीय भूमिकांवर उपस्थित केले प्रश्न

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्राच्या राजकारणाचा दर्जा आणि पातळी इतकी घसरली आहे की, आता राजकारणात काहीही घडू शकते. कोण कधी कोणाच्या जवळ जाईल आणि कोणती राजकीय भूमिका घेईल, याचा अंदाज बांधणेही कठीण झाले आहे, अशी परखड टीका ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी केली. रोहित पवार यांचा शेतकरी मोर्चा आणि सुप्रिया सुळे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या चर्चेमागे दिल्लीतून आखलेली स्क्रिप्ट असल्यासारखे वाटते, असा संशयही त्यांनी व्यक्त केला. बुधवारी नांदेड येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांवर निशाणा साधला.



महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या सुरू असलेल्या घडामोडी पाहता राजकीय विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सुप्रिया सुळे मुख्यमंत्री होणार असल्याच्या चर्चेवर बोलताना हाके म्हणाले की, सुप्रिया सुळे मुख्यमंत्री झाल्या तर शरद पवार यांच्या आजवरच्या राजकारणाची विश्वासार्हता संपुष्टात येईल. पवार कुटुंबाभोवती फिरणारे राजकारण आणि त्यांचे राजकीय वलयही संपेल.रोहित पवार यांच्या शेतकरी मोर्चावरही हाके यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. एका बाजूला कारखाने चालवायचे आणि दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांसाठी आंदोलन करायचे, अशा दुहेरी भूमिका रोहित पवार घेत आहेत. त्यांची धडपड मंत्रिपदासाठी आहे की खरोखर शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी, हे काळानुसार स्पष्ट होईल. रोहित पवारांना आपले नेतृत्व सिद्ध करावे लागेल, असे ते म्हणाले.पवार कुटुंबाच्या राजकीय भूमिकांवर टीका करताना हाके म्हणाले की, एकीकडे शरद पवार मोदी आणि शाह यांची भेट घेतात, तर दुसरीकडे महाराष्ट्रात पुरोगामी विचारांचा पुरस्कार केला जातो. फुले, शाहू, *पान ४ वर*

मंत्री शिरसाटांकडून ५ कोटींच्या कमिशनची मागणी

खा.संजय राऊतांचा घणाघाती आरोप;राजीनाम्याची मागणी,शिरसाटांकडून पलटवार

मुंबई/प्रतिनिधी-साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने लातूरमध्ये उभारण्यात येणाऱ्या ट्रेनिंग सेंटरच्या २५ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यासाठी सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी पाच कोटी रुपयांच्या कमिशनची मागणी केल्याचा गंभीर आरोप खासदार संजय राऊत यांनी केला आहे. या प्रकरणाची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केल्यानंतर मंत्र्यांना आधीच सावध करण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला. शिरसाट यांच्याविरोधात भ्रष्टाचाराची २७ प्रकरणे आपल्याकडे असल्याचे सांगत राऊत यांनी त्यांच्या तात्काळ राजीनाम्याची मागणी केली. या आरोपांमुळे राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.

लातूर येथील नरसिंग उदगीरकर यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने ट्रेनिंग सेंटर उभारण्यासाठी समाजकल्याण विभागाकडे २५ कोटींचा प्रस्ताव सादर केला होता. दलित आणि मातंग समाजातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण देणे हा या प्रकल्पाचा उद्देश होता. मात्र, प्रस्ताव मंजूर करण्यासाठी मंत्री शिरसाट यांनी २० टक्के म्हणजे पाच कोटी रुपये मागितल्याचा आरोप राऊत यांनी केला. उदगीरकर यांनी एवढी रक्कम देणे शक्य नसल्याचे सांगितल्यानंतर पैसे दिल्याशिवाय काम होणार नाही, असे त्यांना सांगण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला.उदगीरकर यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी विश्वास नांगरे-पाटील यांची भेट घेऊन तक्रार केल्याचे राऊत यांनी सांगितले. मात्र, विभागातूनच मंत्र्यांना कारवाईची माहिती देण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

'ग्रीन ट्री थाय स्पा'सेंटरवर एलसीबीची धाड;तीन जणांना अटक

वेश्या व्यवसाय करणाऱ्या तीन महिलांची पोलीसांनी केली सुटका

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील मोर चौकात असलेल्या ग्रीन ट्री थाय स्पा सेंटरवर मंगळवारी सायंकाळी स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी धाड टाकुन तीन जणांना अटक केली. वेश्या व्यवसाय करणाऱ्या तीन परप्रांतीय महिलांची पोलीसांनी सुटका केली आहे.



ग्रीन ट्री स्थाय स्पा सेंटर मध्ये वेश्या व्यवसाय सुरु असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक संदीप जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या नेतृत्वाखाली फौजदार मारुती चव्हाण, महिला फौजदार श्रीमती गायकवाड व पोलीस कर्मचाऱ्यांनी मंगळवार दि.२४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी मोर चौकातील ग्रीन ट्री थाय स्पा सेंटर परिसरात सापळा रचला. एक बनावट ग्राहक तयार करुन ग्रीन ट्री थाय स्पा सेंटरमध्ये पाठविण्यात आले. ग्राहकाने इशारा देताच दोन शासकीय पंचासह पोलीस पथकाने स्पा सेंटरवर धाड टाकली. पोलीसांनी स्पा सेंटरचे मालक परमिंदरसिंघ चावला (वय २८) रा.गुरुद्वारा गेट नं.१, स्पा सेंटरचे मॅनेजर महेश पांडूरंग कोकुलवार (वय २२) रा.सिडको व गोविंद संभाजी सूर्यवंशी (वय १८) रा.सांगवी,नांदेड या तीघांना अटक केली. वेश्या व्यवसाय करणाऱ्या तीन परप्रांतीय महिलांची पोलीसांनी सुटका केली आहे. स्पा सेंटरचे मालक व मॅनेजर हे पिडीत महिलांना जास्त पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करवुन घेत असत. पोलीसांनी घटनास्थळावरुन ५९ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. पोलीस शिपाई रितेश कुलथे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भाग्यनगर पोलीस ठाण्यात तीन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



राजकीय मनोमिलन!

भारतीय राजकारणात कधी काय घडेल, कोण कोणाच्या जवळ जाईल आणि कोण कोणापासून दूर होईल, याचा अंदाज बांधणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. कालपर्यंत एकमेकांचे कट्टर विरोधक असलेले राजकीय पक्ष आज सत्तेच्या व्यासपीठावर एकत्र दिसतात, तर अनेक वर्षे सत्तेत खांद्याला खांदा लावून काम केलेले पक्ष क्षणात एकमेकांपासून दूर जातात. राजकारणात कायमचा मित्र किंवा कायमचा शत्रू नसतो, तर राजकीय परिस्थिती आणि सत्तेची समीकरणे यानुसार मैत्री आणि वैर बदलत असते, याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. पंजाबमध्ये भारतीय जनता पक्ष आणि शिरोमणी अकाली दल यांनी सहा वर्षांचा दुरावा संपवत पुन्हा एकत्र येण्याचा घेतलेला निर्णय हे त्याचे ताजे उदाहरण आहे. केंद्रातील भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा (एनडीए) जुना आणि विश्वासू सहकारी म्हणून अकाली दलाची ओळख होती. पंजाबमध्ये या दोन्ही पक्षांची युती दीर्घकाळ टिकली. राज्यात अकाली दल मोठ्या भावाच्या भूमिकेत, तर भाजप छोट्या भावाच्या भूमिकेत होता. केंद्रातही या दोन्ही पक्षांनी अनेक वर्षे एकत्रितपणे सत्तेत सहभाग घेतला. मात्र, २०२० मध्ये केंद्र सरकारने आणलेल्या तीन कृषी कायद्यांवरून देशभरातील शेतकरी आंदोलन पेटले. पंजाबमधील शेतकऱ्यांचा या आंदोलनात मोठा सहभाग होता. शेतकऱ्यांच्या नाराजीची दखल घेत अकाली दलाने भाजपशी असलेली युती तोडण्याचा निर्णय घेतला. पक्षाच्या नेत्या हरसिमरत कौर बादल यांनी केंद्रीय मंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि अकाली दलाने एनडीएतून बाहेर पडण्याची घोषणा केली. तब्बल २४ वर्षांची राजकीय मैत्री अशा प्रकारे संपुष्टात आली. मात्र, आता सहा वर्षांनंतर आगामी २०२७ च्या पंजाब विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या दोन्ही पक्षांनी पुन्हा हातमिळवणी केली आहे.विशेष म्हणजे, ज्या कृषी कायद्यांच्या विरोधात अकाली दलाने भाजपची साथ सोडली, ते तिन्ही कायदे पुढे केंद्र सरकारला मागे घ्यावे लागले. त्यामुळे त्यावेळी घेतलेल्या भूमिकेचे राजकीय महत्त्व होते. परंतु, आता पुन्हा त्याच भाजपसोबत युती करताना दोन्ही पक्षांनी नव्या राजकीय वास्तवाचा स्वीकार केला आहे. २४ नोव्हेंबर रोजी दिल्ली येथे भाजपचे अध्यक्ष नितीन नबीन, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि अकाली दलाचे अध्यक्ष सुखबीरसिंह बादल यांनी युतीची घोषणा केली. पंजाबमधील ११७ विधानसभा मतदारसंघांसाठी दोन्ही पक्ष एकत्रितपणे निवडणूक लढविणार आहेत. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत स्वतंत्रपणे लढताना भाजपला दोन, तर अकाली दलाला केवळ तीन जागा मिळाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर दोन्ही पक्षांना पुन्हा एकत्र येण्याची गरज जाणवली असावी, असे राजकीय चित्र आहे.महाराष्ट्राच्या राजकारणातही अशाच प्रकारच्या राजकीय मनोमिलनाच्या चर्चा सातत्याने सुरू असतात. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे एकत्रीकरण, शिवसेनेच्या ठाकरे आणि शिंदे गटांमधील संभाव्य जवळीक, तसेच ठाकरे गट आणि भाजप यांच्यातील संभाव्य राजकीय समीकरणे यावरून राजकीय वर्तुळात नेहमीच चर्चा रंगत असतात. अर्थात, या चर्चांना प्रत्यक्ष निर्णयाची जोड मिळेलच असे नाही. परंतु, अशा चर्चांमधून राजकीय पक्षांमधील बदलत्या संबंधांचे चित्र स्पष्ट होते. बिहारच्या राजकारणात नितीशकुमार यांनी वेळोवेळी बदललेल्या राजकीय भूमिका हे आणखी एक उदाहरण आहे. भाजपसोबत दीर्घकाळ सत्तेत राहिल्यानंतर त्यांनी भाजपची साथ सोडून राजद आणि काँग्रेससोबत सरकार स्थापन केले. त्यानंतर पुन्हा भाजपप्रणीत एनडीएमध्ये प्रवेश केला. या राजकीय घडामोडींमुळे बिहारच्या राजकारणात आघाड्यांची समीकरणे किती वेगाने बदलू शकतात, हे देशाने पाहिले आहे.खरे तर लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्षांना आघाडी करण्याचा, भूमिका बदलण्याचा आणि नव्या राजकीय समीकरणांची निर्मिती करण्याचा अधिकार आहे. बदलत्या परिस्थितीनुसार राजकीय निर्णय घेणे गैर नाही. मात्र, या निर्णयांमागे जनहिताचा विचार किती आणि सत्तेची आकांक्षा किती?, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. निवडणुकीपूर्वी मतदारांसमोर मांडलेली भूमिका आणि निवडणुकीनंतर घेतलेले निर्णय यामध्ये सातत्य असणे आवश्यक आहे. अन्यथा, राजकीय पक्षांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. राजकीय युती ही केवळ दोन पक्षांच्या नेत्यांमधील हातमिळवणी नसते. ती त्या पक्षांच्या कार्यकर्त्यांची, समर्थकांची आणि मतदारांचीही कसोटी असते. कालपर्यंत ज्या पक्षाविरोधात प्रचार केला, त्याच पक्षाचा झेंडा आज हातात घेण्याची वेळ कार्यकर्त्यांवर येते. अशा वेळी विचारधारा, तत्त्वनिष्ठा आणि राजकीय बांधिलकी यांचे काय होते, हा प्रश्न अनुत्तरित राहतो.राजकारणात सत्तेची गणिते बदलत राहणार, युती आणि आघाड्या होत राहणार. मात्र, या सगळ्या राजकीय मनोमिलनात सामान्य मतदारांच्या प्रश्नांना दुय्यम स्थान मिळू नये. शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी, महागाई, शिक्षण, आरोग्य आणि विकास या मुद्द्यांवर राजकीय पक्षांनी आपली बांधिलकी स्पष्ट केली पाहिजे. केवळ निवडणुकीतील विजयासाठी होणारे मनोमिलन आणि जनतेच्या प्रश्नांवर होणारे मनोमिलन यामध्ये मोठा फरक आहे. राजकीय पक्ष एकत्र येणे ही त्यांची राजकीय गरज असू शकते; परंतु जनतेच्या हितासाठी एकत्र येणे ही त्यांची लोकशाहीतील जबाबदारी आहे. अखेर सत्तेची समीकरणे नेते ठरवतात, पण त्या समीकरणांचा हिशेब मतदारच निवडणुकीत चुकता करतात, हे राजकीय पक्षांनी विसरता कामा नये.

यशवंतराव चव्हाण:महाराष्ट्राच्या जडणघडणीचे शिल्पकार



महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वांचे योगदान इतके महत्त्वपूर्ण आहे की, त्यांच्या कार्याचा विचार केल्याशिवाय आधुनिक महाराष्ट्राची ओळख पूर्ण होऊ शकत नाही. अशा व्यक्तिमत्त्वांमध्ये यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, देशाचे संरक्षणमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, उपपंतप्रधान आणि एक अभ्यासू विचारवंत म्हणून त्यांनी भारतीय राजकारणात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ सत्तेच्या राजकारणापुरते मर्यादित नव्हते, तर समाजाच्या सर्वांगीण विकासाची व्यापक दृष्टी, लोकशाहीवरील निष्ठा, ग्रामीण विकासाची तळमळ, शिक्षणाविषयीची आस्था आणि सामाजिक समतेची भूमिका या गुणवैशिष्ट्यांनी ते समृद्ध होते. २५ नोव्हेंबर हा त्यांचा स्मृतिदिन. या निमित्ताने त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे महाराष्ट्राच्या जडणघडणीतील एका महत्त्वपूर्ण पर्वाचा आढावा घेणे होय.

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावात एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांना प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागला. वडिलांचे छत्र लहानपणीच हरपल्यामुळे त्यांच्या आई विठाबाई यांनी कष्टाने आणि जिद्दीने त्यांचे संगोपन केले. आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही त्यांनी मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. ग्रामीण जीवनातील संघर्ष, शेतकऱ्यांच्या अडचणी, सामान्य माणसाचे प्रश्न आणि सामाजिक विषमता यांचा अनुभव यशवंतरावांना बालपणापासून मिळाला. या अनुभवांनी त्यांच्या विचारविश्वाला आकार दिला. पुढे राजकीय जीवनात त्यांनी ग्रामीण समाजाच्या विकासाला आणि सामान्य माणसाच्या उन्नतीला जे महत्त्व दिले, त्यामागे त्यांच्या बालपणातील अनुभवांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. शिक्षण घेत असतानाच त्यांच्यामध्ये राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीविषयी आकर्षण निर्माण झाले. महात्मा गांधींचे विचार, लोकमान्य टिळकांचे राष्ट्रप्रेम, महात्मा फुले यांची सामाजिक परिवर्तनाची भूमिका आणि राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक न्यायाचे कार्य यांचा त्यांच्या वैचारिक जडणघडणीवर प्रभाव पडला. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि लोकशाही या मूल्यांविषयी त्यांच्या मनात आदर निर्माण झाला. १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीच्या काळात त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेतला. विद्यार्थिदशेतच राष्ट्रीय कार्यात सहभागी झाल्यामुळे त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग हा त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा महत्त्वपूर्ण प्रारंभ ठरला. त्यांनी राजकारणाकडे केवळ सत्ताप्राप्तीचे साधन म्हणून न पाहता समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणून पाहिले.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशासमोर लोकशाही व्यवस्था स्थिर करण्याचे, सामाजिक विषमता दूर करण्याचे आणि आर्थिक विकासाची पायाभरणी करण्याचे मोठे आव्हान होते. त्याच काळात महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीची मागणीही अधिक तीव्र झाली होती. भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नावर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उभी राहिली. मराठी भाषिक प्रदेशांचे एकसंध राज्य निर्माण व्हावे, ही जनतेची भावना होती. या चळवळीमध्ये अनेक कार्यकर्ते, विचारवंत, साहित्यिक आणि सामान्य नागरिक सहभागी झाले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी झालेल्या संघर्षात अनेकांनी बलिदान दिले. या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले. नव्याने स्थापन झालेल्या राज्याच्या प्रशासनाची, विकासाची आणि सामाजिक ऐक्याची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली. ही जबाबदारी त्यांनी दूरदृष्टीने आणि समन्वयवादी दृष्टिकोनातून पार पाडली.

नवीन महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर राज्यासमोर अनेक मूलभूत प्रश्न होते. ग्रामीण भागातील दारिद्र्य, शेतीची अनिश्चितता, औद्योगिक विकासाचा अभाव, शिक्षणाच्या मर्यादित सुविधा, पायाभूत सुविधांची कमतरता आणि प्रादेशिक असमतोल ही प्रमुख आव्हाने होती. या सर्व प्रश्नांकडे त्यांनी परस्परांशी संबंधित विकासाच्या दृष्टीने पाहिले. महाराष्ट्राचा विकास केवळ मुंबई, पुणे किंवा काही प्रमुख शहरांपुरता मर्यादित राहू नये, तर ग्रामीण आणि दुर्गम भागांपर्यंत पोहोचावा, अशी त्यांची भूमिका होती. विकासाच्या प्रक्रियेत समाजातील सर्व घटकांना सहभागी करून घेणे आवश्यक आहे, याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच त्यांनी प्रशासन, सहकार, शिक्षण, शेती आणि उद्योग या क्षेत्रांना विकासाच्या व्यापक आराखड्यात महत्त्वाचे स्थान दिले. महाराष्ट्राच्या विकासात सहकार चळवळीला त्यांनी विशेष महत्त्व दिले. ग्रामीण भागातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा, त्याला उत्पादन, प्रक्रिया, साठवणूक आणि बाजारपेठ यांमध्ये योग्य संधी मिळाव्यात, यासाठी सहकार हे प्रभावी माध्यम ठरू शकते, असा त्यांचा विश्वास होता. सहकारी साखर कारखाने, सहकारी दूध संस्था, सहकारी पतसंस्था आणि कृषीविषयक सहकारी संस्था यांच्या विकासाला त्यांनी प्रोत्साहन दिले. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आर्थिक उपक्रम उभारावेत आणि सामूहिक प्रयत्नांतून स्वतःची प्रगती साधावी, हा सहकाराचा मूलभूत विचार त्यांनी पुढे नेला. सहकारामुळे ग्रामीण भागात आर्थिक व्यवहारांना चालना मिळाली, रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आणि स्थानिक नेतृत्व विकसित होण्यास मदत झाली. महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या परिवर्तनात सहकार चळवळीने महत्त्वाची भूमिका बजावली. ग्रामीण लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी त्यांनी पंचायत राज व्यवस्थेचा पुरस्कार केला. लोकशाही केवळ संसद आणि विधानसभेपुरती मर्यादित न राहता गावपातळीपर्यंत पोहोचली पाहिजे, असे त्यांचे मत होते. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या त्रिस्तरीय व्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना स्थानिक विकासाच्या निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार आणि जबाबदाऱ्या मिळाल्यास गावांच्या गरजांनुसार विकासकामे करता येतील, असा त्यांचा विश्वास होता. महाराष्ट्रातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती व्यवस्थेच्या उभारणीला त्यांनी प्रोत्साहन दिले. या व्यवस्थेमुळे ग्रामीण नेतृत्वाला संधी मिळाली, स्थानिक पातळीवरील लोकशाही प्रक्रिया मजबूत झाली आणि ग्रामीण भागातील विकासाच्या प्रश्नांना संस्थात्मक स्वरूप प्राप्त झाले. आज विकेंद्रीकरण, ग्रामविकास आणि लोकसहभाग यांची चर्चा करताना त्यांच्या या दूरदृष्टीचे महत्त्व लक्षात येते.शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वांत प्रभावी साधन आहे, अशी त्यांची ठाम धारणा होती. समाजातील गरीब, वंचित, ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत शिक्षण पोहोचल्याशिवाय सामाजिक समता निर्माण होऊ शकत नाही, हे त्यांनी ओळखले होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी त्यांनी शिक्षणसंस्थांच्या विस्ताराला प्रोत्साहन दिले. रयत शिक्षण संस्थेशी त्यांचा निकटचा संबंध होता. शिक्षणाचा प्रसार, शैक्षणिक संस्थांचे बळकटीकरण आणि विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणे या बाबींना त्यांनी महत्त्व दिले. शिक्षण हे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकास, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदार नागरिकत्व निर्माण करण्याचे माध्यम आहे, अशी त्यांची भूमिका होती. ग्रामीण भागातील मुलामुलींना शिक्षणाची संधी मिळाल्यास त्यांच्या जीवनात परिवर्तन घडू शकते आणि त्यातून संपूर्ण समाजाच्या विकासाला गती मिळू शकते, असा त्यांचा विश्वास होता.

शेती आणि उद्योग यांच्यात समतोल साधण्याची त्यांची आर्थिक विकासविषयक भूमिका विशेष उल्लेखनीय होती. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर आधारित असल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेतीचे आधुनिकीकरण करणे, सिंचनाच्या सुविधा निर्माण करणे आणि कृषी उत्पादनाला योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, याची त्यांना जाणीव होती. त्याच वेळी केवळ शेतीवर अवलंबून राहून राज्याचा आर्थिक विकास साधता येणार नाही, हेही त्यांनी ओळखले होते. त्यामुळे कृषीपूरक उद्योग, लघुउद्योग, मध्यम उद्योग आणि मोठ्या औद्योगिक प्रकल्पांच्या विकासाला त्यांनी चालना दिली. शेतीमधील उत्पादनाला प्रक्रिया उद्योगांची जोड मिळाल्यास ग्रामीण भागात रोजगार निर्माण होईल, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल आणि ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम बनेल, अशी त्यांची विकासाची संकल्पना होती. कृषी आणि औद्योगिक क्षेत्रांचा परस्परपूरक विकास हा त्यांच्या आर्थिक विचारांचा महत्त्वाचा आधार होता.सिंचन, वीज, रस्ते, वाहतूक आणि दळणवळण यांसारख्या पायाभूत सुविधांच्या विकासालाही त्यांनी प्राधान्य दिले. ग्रामीण भागातील विकासासाठी पायाभूत सुविधांची उपलब्धता आवश्यक असते. शेतीला पाणी, उद्योगांना वीज, बाजारपेठांपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ते आणि नागरिकांसाठी शिक्षण व आरोग्याच्या सुविधा उपलब्ध झाल्याशिवाय विकासाची प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे राज्याच्या विकासाचे नियोजन करताना त्यांनी विविध क्षेत्रांचा एकत्रित विचार केला. विकासाचा लाभ केवळ संपन्न आणि शहरी भागांपुरता मर्यादित राहू नये, तर दुर्गम, आदिवासी आणि मागास भागांतील नागरिकांनाही मिळावा, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. प्रादेशिक असमतोल दूर करण्याची आवश्यकता त्यांनी सातत्याने अधोरेखित केली. महाराष्ट्राच्या विकासाला एक व्यापक आणि सर्वसमावेशक दिशा देण्याचे त्यांचे कार्य या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते. १ नोव्हेंबर १९५६ पासून द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले होते. त्यामुळे प्रशासकीय अनुभव, विविध भाषिक समूहांशी संवाद आणि राज्याच्या राजकीय गुंतागुंतीचे आकलन त्यांना आधीपासूनच होते. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर मराठी भाषिक जनतेच्या आकांक्षा पूर्ण करण्याबरोबरच राज्यातील सर्व समाजघटकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण करणे हे त्यांच्यासमोरचे महत्त्वाचे आव्हान होते. त्यांनी प्रादेशिक किंवा भाषिक भावनांना संघर्षाचे स्वरूप न देता विकासाच्या समान ध्येयाभोवती समाजाला एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर त्यांनी केलेले एक महत्त्वाचे आवाहन म्हणजे, राज्यनिर्मितीसाठी झालेला संघर्ष इतिहासजमा करून आता नव्या महाराष्ट्राच्या उभारणीसाठी सर्वांनी एकत्र यावे. या भूमिकेतून त्यांचा समन्वयवादी दृष्टिकोन आणि व्यापक लोकशाही विचार स्पष्ट होतो.

१९६२ मध्ये भारत-चीन युद्धानंतर देशाच्या संरक्षण व्यवस्थेसमोर गंभीर आव्हान निर्माण झाले. अशा परिस्थितीत तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना केंद्रीय मंत्रिमंडळात संरक्षणमंत्री म्हणून काम करण्यासाठी दिल्लीला बोलावले. राज्याच्या राजकारणातून राष्ट्रीय राजकारणात प्रवेश करताना त्यांच्यावर देशाच्या संरक्षणाची मोठी जबाबदारी सोपविण्यात आली. त्यांनी संरक्षणमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर भारतीय सैन्यदलांचे मनोबल उंचावणे, संरक्षण व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे, आधुनिक शस्त्रसामग्रीची आवश्यकता ओळखणे आणि संरक्षण क्षेत्रात स्वावलंबन निर्माण करणे यांवर भर दिला. युद्धानंतरच्या निराशाजनक वातावरणातून देशाला बाहेर काढण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. सैनिकांचे मनोबल, सैन्यदलांचे आधुनिकीकरण आणि राष्ट्रीय सुरक्षेची जाणीव यांना त्यांनी विशेष महत्त्व दिले. त्यांच्या कार्यकाळात संरक्षण व्यवस्थेच्या पुनर्बांधणीसाठी महत्त्वपूर्ण प्रयत्न झाले. संकटाच्या काळात शांतपणे परिस्थितीचे आकलन करून योग्य निर्णय घेण्याची त्यांची क्षमता या जबाबदारीतून दिसून आली. केंद्रीय मंत्रिमंडळात त्यांनी संरक्षणमंत्रिपदानंतर गृहमंत्री, अर्थमंत्री आणि परराष्ट्रमंत्री अशा महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. १९६६ ते १९७० या काळात त्यांनी केंद्रीय गृहमंत्री म्हणून देशातील अंतर्गत सुरक्षा, सामाजिक सलोखा आणि प्रशासकीय प्रश्न हाताळले. १९७० ते १९७४ या काळात अर्थमंत्री म्हणून देशाच्या आर्थिक व्यवस्थापनात योगदान दिले. अर्थव्यवस्थेतील आव्हाने, विकासासाठी आवश्यक असलेली आर्थिक साधनसंपत्ती आणि विविध क्षेत्रांमधील संसाधनांचे नियोजन यांसारख्या प्रश्नांवर त्यांनी काम केले. १९७४ ते १९७७ या काळात परराष्ट्रमंत्री म्हणून त्यांनी भारताचे आंतरराष्ट्रीय संबंध अधिक दृढ करण्यासाठी प्रयत्न केले. भारताचे राष्ट्रीय हित जपत जागतिक राजकारणातील बदलत्या परिस्थितीचा विचार करण्याची त्यांची भूमिका होती. १९७९ मध्ये त्यांनी भारताचे उपपंतप्रधान आणि गृहमंत्री म्हणूनही जबाबदारी सांभाळली. देशाच्या विविध महत्त्वपूर्ण पदांवर काम करताना त्यांनी प्रशासकीय अनुभव, अभ्यासपूर्ण दृष्टिकोन आणि निर्णयक्षमता यांचा परिचय करून दिला.

यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व केवळ कुशल प्रशासक आणि राजकारणी म्हणून मर्यादित नव्हते. ते उत्तम वक्ते, साहित्यप्रेमी, वाचनशील आणि चिंतनशील विचारवंत होते. राजकारण आणि साहित्य यांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध असतो, असे त्यांचे मत होते. समाजातील बदल, मानवी नातेसंबंध, ग्रामीण जीवन, संस्कृती आणि राजकीय घडामोडी यांचे सूक्ष्म निरीक्षण करण्याची त्यांची वृत्ती होती. मराठी साहित्य, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र आणि राजकीय विचार यांचा त्यांनी अभ्यास केला होता. साहित्यिक, लेखक, कवी आणि विचारवंत यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात राजकीय व्यवहारज्ञान आणि सांस्कृतिक संवेदनशीलता यांचा सुंदर संगम दिसून येतो. महाराष्ट्राच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक जीवनाच्या विकासाला त्यांनी प्रोत्साहन दिले. सार्वजनिक जीवनात विचारांची समृद्धी आणि सांस्कृतिक जाणिवा आवश्यक आहेत, याची त्यांना जाणीव होती. त्यांचे कृष्णाकाठ हे आत्मचरित्र मराठी साहित्यविश्वातील एक महत्त्वपूर्ण पुस्तक आहे. या पुस्तकातून त्यांच्या बालपणापासूनच्या जीवनप्रवासाचे, ग्रामीण समाजजीवनाचे, स्वातंत्र्य चळवळीतील अनुभवांचे आणि राजकीय जडणघडणीचे दर्शन घडते. त्यांच्या जीवनातील संघर्ष, आईचे संस्कार, सामाजिक परिस्थिती, राजकीय विचारांची निर्मिती आणि सार्वजनिक जीवनातील अनुभव यांचे त्यांनी अत्यंत आत्मीयतेने चित्रण केले आहे. कृष्णाकाठ हे केवळ एका राजकीय नेत्याचे आत्मचरित्र नाही, तर विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाचा महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. या लेखनातून त्यांच्यातील संवेदनशील माणूस, चिकित्सक विचारवंत आणि समाजाच्या प्रश्नांशी एकरूप झालेला कार्यकर्ता वाचकांसमोर येतो. त्यांच्या भाषेत सहजता, अनुभवांची प्रगल्भता आणि विचारांची स्पष्टता आढळते. त्यांच्या राजकीय विचारांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्याय यांवरील त्यांची निष्ठा. समाजात विविध जाती, धर्म, भाषा, संस्कृती आणि आर्थिक स्तरांतील लोक एकत्र राहतात. या विविधतेचा आदर राखून समाजात बंधुभाव निर्माण करणे हे लोकशाही व्यवस्थेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे, अशी त्यांची धारणा होती. सामाजिक विषमता, जातीय भेदभाव आणि आर्थिक शोषण यांमुळे समाजाची प्रगती खुंटते, याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे समाजातील दुर्बल घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे, असे ते मानत. लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका आणि सत्तांतर नव्हे, तर सामान्य नागरिकांच्या जीवनात प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, समान संधी आणि न्याय निर्माण करणारी व्यवस्था होय, असा त्यांच्या राजकीय भूमिकेचा आशय होता. विरोधी विचारांचा आदर करणे, चर्चेतून मार्ग काढणे आणि मतभेद असूनही संवाद कायम ठेवणे ही त्यांची कार्यपद्धती होती. राजकीय विरोधकांशीही सुसंवाद राखण्याची त्यांची क्षमता त्यांच्या लोकशाही स्वभावाचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात संयम, नम्रता, अभ्यासू वृत्ती आणि सर्वांना सोबत घेऊन जाण्याची क्षमता होती. राजकारणात यशस्वी होण्यासाठी केवळ लोकप्रियता पुरेशी नसते, तर समाजाच्या प्रश्नांची जाण, व्यापक वाचन, परिस्थितीचे विश्लेषण आणि योग्य निर्णय घेण्याची क्षमता आवश्यक असते, हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले. राजकीय मतभेदांना वैयक्तिक शत्रुत्वाचे स्वरूप न देता वैचारिक पातळीवर चर्चा करण्याची त्यांची भूमिका आजच्या राजकीय वातावरणातही महत्त्वपूर्ण आहे. सार्वजनिक जीवनातील व्यक्तीने आपल्या पदापेक्षा जबाबदारीला अधिक महत्त्व द्यावे, अशी त्यांची कार्यशैली होती. सत्ता ही समाजसेवेचे साधन आहे, हे त्यांनी आपल्या संपूर्ण राजकीय प्रवासातून अधोरेखित केले.

डॉ.राजेंद्र बगाटे

यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचा विचार करताना त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात निर्माण झालेल्या विकासाच्या पायाभूत रचनेचा विशेष उल्लेख करावा लागतो. सहकार चळवळ, पंचायत राज व्यवस्था, शिक्षणाचा प्रसार, कृषी आणि औद्योगिक विकास, ग्रामीण नेतृत्वाची निर्मिती आणि सांस्कृतिक क्षेत्राला मिळालेले प्रोत्साहन या विविध क्षेत्रांतील त्यांच्या योगदानामुळे आधुनिक महाराष्ट्राच्या विकासाला दिशा मिळाली. त्यांनी सुरू केलेल्या अनेक विकासविषयक प्रक्रियांचा प्रभाव पुढील अनेक दशकांपर्यंत राज्याच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनावर राहिला. त्यांच्या कार्याचा वारसा केवळ प्रशासकीय निर्णयांमध्ये नसून महाराष्ट्राच्या विकासाविषयी निर्माण झालेल्या व्यापक दृष्टिकोनात आहे. ग्रामीण भागातील सामान्य माणसालाही विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होता आले पाहिजे, ही त्यांची भूमिका आजही तितकीच महत्त्वाची आहे. आज महाराष्ट्रसमोर शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शेतीतील अनिश्चितता, बेरोजगारी, ग्रामीण-शहरी विषमता, शिक्षणातील असमानता, औद्योगिक विकासातील प्रादेशिक तफावत, पाण्याचे नियोजन, पर्यावरणाचे प्रश्न आणि सामाजिक सलोखा टिकविण्याची आव्हाने उभी आहेत. अशा परिस्थितीत यशवंतराव चव्हाण यांच्या विकासविषयक विचारांचे पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक ठरते. कृषी आणि उद्योग यांचा समतोल, सहकारातून आर्थिक सक्षमीकरण, स्थानिक स्वराज्य संस्थांचे बळकटीकरण, शिक्षणाचा सर्वसमावेशक प्रसार आणि लोकशाही प्रक्रियेत सामान्य माणसाचा सहभाग या त्यांच्या विचारांमधून आजच्या प्रश्नांची उत्तरे शोधता येऊ शकतात. विकास हा केवळ आर्थिक आकडेवारीत मोजला जाऊ नये, तर समाजातील शेवटच्या घटकाच्या जीवनमानात झालेल्या सुधारणांमधून त्याचे मूल्यमापन व्हावे, हा विचार त्यांच्या कार्यातून पुढे येतो.

२५ नोव्हेंबर १९८४ रोजी नवी दिल्ली येथे यशवंतराव चव्हाण यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक दूरदृष्टी असलेला नेता, अभ्यासू राजकारणी, संवेदनशील साहित्यप्रेमी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आयुष्य समर्पित करणारे व्यक्तिमत्त्व गमावले. कराड येथील कृष्णा आणि कोयना नद्यांच्या संगमाजवळील प्रीतिसंगम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ज्या भूमीतून त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा प्रवास सुरू झाला, त्याच भूमीशी त्यांचे नाते अखेरपर्यंत कायम राहिले. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी आणि विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी विविध संस्थांच्या माध्यमातून कार्य सुरू आहे. त्यांच्या नावाने स्थापन झालेले यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि यशवंतराव चव्हाण केंद्र यांसारख्या संस्थांनी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि विकासविषयक उपक्रमांद्वारे त्यांचे विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. यशवंतराव चव्हाण यांचा स्मृतिदिन हा केवळ एका महान नेत्याच्या आठवणींना उजाळा देण्याचा दिवस नाही, तर त्यांनी मांडलेल्या विकासाच्या, सामाजिक समतेच्या, लोकशाहीच्या आणि मानवतावादी मूल्यांच्या विचारांचे आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. त्यांनी महाराष्ट्राला केवळ राजकीय नेतृत्व दिले नाही, तर नव्या राज्याच्या विकासासाठी व्यापक विचारदृष्टी आणि कार्यसंस्कृती दिली. राज्यनिर्मितीच्या संघर्षानंतर विकासनिर्मितीचे आव्हान स्वीकारून त्यांनी महाराष्ट्राला प्रगतीच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न केला. आजच्या पिढीने त्यांच्या जीवनातून संघर्षशीलता, अभ्यासू वृत्ती, सामाजिक बांधिलकी, समन्वयाची भावना आणि दूरदृष्टी हे गुण आत्मसात करणे आवश्यक आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जतन करण्याचा खरा मार्ग म्हणजे शिक्षण, सहकार, सामाजिक न्याय, ग्रामीण विकास आणि लोकशाही मूल्यांच्या बळकटीकरणासाठी प्रामाणिकपणे कार्य करणे हा होय. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या या महान नेतृत्वाचे स्मरण करताना त्य

राहेर येथील डीपी वारंवार जळते; अतिरिक्त वीजभारामुळे शेतकऱ्यांचे नुकसान

नायगाव/प्रतिनिधी-राहेर येथील शेतकऱ्यांच्या कृषिपंपांना वीजपुरवठा करणाऱ्या डीपीवर वाढत्या वीजभारामुळे शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. वारंवार डीपी जळणे, मोटारी बंद पडणे, स्टार्टर जळणे आणि डीपीचे डीओ उडणे असे प्रकार घडत असल्याने महावितरणच्या स्थानिक यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. विशेषतः डीपीवरील अतिरिक्त भार रोखण्याची जबाबदारी असलेल्या संबंधित लाईनमनकडून याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही.



शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, राहेर येथील संबंधित डीपीची क्षमता १०० एचपी असून, त्यावर कोटेशनधारकांचा ८० एचपी भार आहे. या डीपीवर कोटेशन असलेल्या १६ मोटारी, तर विना कोटेशनच्या ११ ते १२ मोटारी जोडलेल्या असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. परिणामी डीपीवर क्षमतेपेक्षा अधिक भार येत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. विना कोटेशनच्या मोटारींवर नियंत्रण ठेवणे, डीपीवरील प्रत्यक्ष वीजभाराची नियमित तपासणी करणे आणि तांत्रिक बिघाड होण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अपेक्षित आहे. मात्र, राहेर येथील डीपी वारंवार जळत असल्याने स्थानिक वीज यंत्रणेच्या देखभाल व नियंत्रणाच्या कामकाजाबाबत शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे. डीपी जळाल्यानंतर शेतकऱ्यांना वीजपुरवठा पूर्ववत होण्यासाठी प्रतीक्षा करावी लागते. याचा थेट परिणाम पिकांच्या पाणीपुरवठ्यावर होत असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण होत आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी राहेर येथील शेतकऱ्यांनी महावितरणच्या शाखा अभियंता कार्यालय, कासराळी येथे तसेच उपविभागीय कार्यालय, देगलूर येथे निवेदन सादर केले आहे. संबंधित लाईनमनच्या कामकाजाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करावी, राहेर येथील डीपीवरील प्रत्यक्ष वीजभाराची तपासणी करावी, बगर कोटेशनच्या मोटारींबाबत नियमानुसार कारवाई करावी आणि वारंवार डीपी जळण्यामागील तांत्रिक कारणे शोधून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

गावाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामस्थांनी एकत्र यावे-गट विकास अधिकारी शेखर देशमुख

खरबी ग्रामपंचायतीला स्वच्छता व समृद्धी अभियानांतर्गत भेट;विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी

नांदेड/प्रतिनिधी-गाव स्वच्छ, शाश्वत व विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून समृद्ध करण्यासाठी ग्रामस्थांनी एकत्र येऊन सामूहिक प्रयत्न करावेत, असे आवाहन भोकर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी शेखर देशमुख यांनी केले.

भोकर तालुक्यातील खरबी येथे स्वच्छ शौचालय- गरिमामय भविष्य तसेच मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत त्यांनी आज गावाला भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातील गुणांकन व निकषांनुसार गावात राबविण्यात येत असलेल्या विविध विकासकामांची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी सार्वजनिक शौचालय तसेच शाळेतील स्वच्छता संकुलाचीही पाहणी करून स्वच्छतेच्या अनुषंगाने आवश्यक सूचना केल्या.स्वच्छ भारत मिशनअंतर्गत गावातील वैयक्तिक, सार्वजनिक व संस्थात्मक शौचालये स्वच्छ व सुस्थितीत कार्यान्वित असणे आवश्यक आहे. याच उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या वतीने स्वच्छ शौचालय-गरिमामय भविष्य हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवावा. विशेषतः महिला, मुली आणि दिव्यांग व्यक्तींचा सन्मान जपत त्यांना सुरक्षित व स्वच्छताविषयक सुविधा उपलब्ध करून देणे, हा या अभियानाचा महत्त्वाचा उद्देश असल्याचे देशमुख यांनी सांगितले.खरबी ग्रामपंचायतीने यापूर्वी स्मार्ट ग्राम तसेच धरती आबा अभियानांतर्गत तालुका स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातही ग्रामपंचायतीने तालुका स्तरावर तृतीय क्रमांक मिळविला असून आता जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी ग्रामपंचायत सज्ज झाली आहे.यावेळी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे माहिती, शिक्षण व संवाद तज्ज्ञ मिलिंद व्यवहारे, भगवानराव कल्याणकर, गट समन्वयक प्रदीप वाठोरे, ग्रामपंचायत अधिकारी जी.पी. वानखेडे, प्रतापराव कल्याणकर, राजू चेनेवाड, राजू मोरे, मुख्याध्यापक बाबुराव माडगे, संतोष सूर्यवंशी, बचत गटाच्या सीआरपी ज्योती भगत, विजय कल्याणकर, रतनबाई कल्याणकर, वर्षा बडबडकर आदी उपस्थित होते.



आ.डॉ.तुषार राठोड यांना खंडणीसाठी जीवे मारण्याची धमकी देणारा आरोपी जेरबंद

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ.डॉ.तुषार गोविंदराव राठोड यांना फोनवरून खंडणीची मागणी करत जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीला नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या २४ तासांच्या आत नागपूर येथून अटक केली आहे. बाळासाहेब भास्कर राख (वय २४, मूळ रा. ढाकलगाव, ता.अंबड, जि.जालना;सध्या रा.हसनबाग, नंदनवन, नागपूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



सविस्तर वृत्त असे की, २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.४० वा. सुमारास आ. तुषार राठोड हे मुखेड ते नांदेड असा प्रवास करत होते. यावेळी एका अज्ञात व्यक्तीने त्यांच्या मोबाईलवर फोन करून खंडणीची मागणी केली. तसेच, शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकीही दिली. या प्रकारानंतर आमदार राठोड यांनी मुखेड पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला होता. सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांना आरोपीचा तात्काळ शोध घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार विशेष पथके तैनात करण्यात आली होती. २३ नोव्हेंबर रोजी पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे यांना गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाद्वारे संशयित आरोपी नागपूरच्या नंदनवन परिसरातील हसनबाग येथे असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. पथकाने तातडीने नागपूर गाठत सापळा रचला आणि आरोपीला ताब्यात घेतले.पोलिसी खाक्या दाखवताच आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. पुढील तपासासाठी त्याला मुखेड पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून, तपास अधिकारी उपनिरीक्षक संदिप यामावार यांनी आरोपीला मुखेड न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली आहे.

त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त गोदावरी गंगा पूजन व आरती उत्साहात संपन्न

नांदेड/प्रतिनिधी-त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त आयोजित २६ व्या गोदावरी गंगा पूजन सोहळ्यात हजारो महिलांनी एकाच वेळी गोदावरी मातेची आरती केल्याने नगीना घाटाचा संपूर्ण परिसर दीपप्रकाशाने उजळून निघाला. मोरपंखी साड्या परिधान केलेल्या हजारो महिलांच्या सामूहिक आरतीचे विहंगम दृश्य उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारे होते. भव्य आतषबाजी, सांगीतिक आरती आणि धार्मिक वातावरणाने हा सोहळा अविस्मरणीय ठरला. हा अभूतपूर्व सोहळा पाहण्यासाठी नांदेडकरांनी मोठी गर्दी केली होती.



कार्यक्रमाच्या प्रारंभी लंगर साहेब गुरुद्वाराचे प्रतिनिधी बाबा सुबेक सिंग यांच्या हस्ते गोदावरी माता, गोदावरी नदी आणि गुरु नानकजी यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून मनपा अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, भाजपा जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे, ड. किशोर देशमुख, प्रदेश युवती प्रमुख सांभवी साले, महिला व बालकल्याण सभापती सदिच्छा सोनी, आशा शिंदे, नगरसेविका रुची भारतीया व अमृता ठाकूर, प्रवीण साले, विजय येवणकर, शीतल खांडील, विजय गंभीरे, व्यंकटेश जिंदम, बागड्या यादव, अनिल हजारी आणि कामाजी सरोदे,अनिल चिद्रावार हे उपस्थित होते.लायन्सचे पूर्वप्रांतपाल जयेश ठक्कर, ड. प्रवीण अग्रवाल, रवि कडगे, धनंजय डोईफोडे तसेच अन्य लायन्स पदाधिकाऱ्यांचा अमृता व योगेश जायसवाल यांच्या हस्ते शिरोपाव व मोत्याची माळ देऊन सन्मान करण्यात आला. संयोजक धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांनी प्रास्ताविकातून गेल्या वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने आयोजित करण्यामागील भूमिका स्पष्ट केली. हरिद्वार आणि वाराणसीनंतर भव्यतेच्या बाबतीत जगातील तृतीय क्रमांकाची गंगा आरती म्हणून नांदेडच्या या सोहळ्याची ओळख निर्माण झाली असून, गेल्या वर्षी या उपक्रमाची लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाल्याचे त्यांनी सांगितले.

CHANGE IN NAME

My (old name) is **ALURKAR SHRIDHAR SRINIVASRAO** which now I am, changing as (new name) **SHRIDHAR SRINIWASRAO ALURKAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
SHRIDHAR SRINIWASRAO ALURKAR
R/o 2-11-477, Alurkar Hospital
Dilipsing Colony Vazirabad Nanded-431601
Mob.no. 9421222444

CHANGE IN NAME

My (old name) is **DESHMUKH ALURKAR KAOUSHAL** which now I am, changing as (new name) **KAOUSHAL SHRIDHAR DESHMUKH ALURKAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
KAOUSHAL SHRIDHAR DESHMUKH ALURKAR
R/o H.no.2-12-297, near Jalaram Mandir
Dilipsingh Colony Vazirabad Nanded-431601
Mob.no. 9421222444

भानुदास रत्नपारखी यांचे निधन

मुदखेड/प्रतिनिधी-बारड येथील सेवानिवृत्त शिक्षक भानुदास नरहरी रत्नपारखी (वय ७०) यांचे आज (बुधवार) दि.२५ नोव्हेबर अल्पशा आजाराने निधन झाले.



भानुदास रत्नपारखी यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंड असा मोठा परिवार आहे. शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावत सेवानिवृत्तीनंतर वारकरी संप्रदायाचे धार्मिक परंपरा लाभलेल्या कुटुंबातून त्यांनी धार्मिक आचरण, श्रद्धा, वारकरी विचारांचा वारसा जोपासला असून धार्मिक कार्यातही मोलाचे योगदान राहिले आहे.

CHANGE IN NAME

My (old name) is **SHRIDHAR ALURKAR** which now I am, changing as (new name) **SHRIDHAR SRINIWASRAO ALURKAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
SHRIDHAR SRINIWASRAO ALURKAR
R/o 2-11-477, Alurkar Hospital
Dilipsing Colony Vazirabad Nanded-431601
Mob.no. 9421222444

बानाई संघटनेच्या जनरल सेक्रेटरीपदी संजीवन गायकवाड यांची निवड

नांदेड/प्रतिनिधी- डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनियर्स (बानाई) महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या प्रदेश जनरल सेक्रेटरीपदी संजीवन गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनियर्स (बानाई) राज्यस्तरीय अभियंता संमेलन, सर्वसाधारण सभा व महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी निवडणूक, इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स फिरोधीया हॉल, पुणे येथे दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी पार पडली. राज्यस्तरीय अभियंता संमेलनाचे उद्घाटन पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून इंजि. धनराज तावडे, भरतकुमार बाविस्कर, जी. एम. कंधारे, प्रदीप नगरारे हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंजि. कुलदीप रामटेके हे होते. प्रसिद्ध लेखक व प्रशिक्षक तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी व निबंधक, यशदा, पुणे राजीव नंदकर यांनी अभियंत्यांची समाज विकासात भूमिका यावरती सविस्तर व्याख्यान दिले. त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी पी.के. त्रिभुवन यांनी सन २०२६ ते २०२८ करिता नवीन निवडून आलेली राज्य कार्यकारिणी जाहीर करण्यात आली, त्यात इंजि. संजीवन गायकवाड यांची बानाई महाराष्ट्र राज्य, जनरल सेक्रेटरीपदी निवड करण्यात आली. नवनिर्वाचित बानाई, महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी याप्रमाणे :- अध्यक्ष: इंजि.पांडुरंग शेलार (पुणे), उपाध्यक्ष : इंजि.एम.जे. वाघमारे (मुंबई) उपाध्यक्ष : भास्कर एच. खोब्रागडे (नागपूर), जनरल सेक्रेटरी : इंजि. संजीवन ए.गायकवाड (नांदेड), सहसचिव: इंजि.विजय कांबळे (पिंपरी चिंचवड), कोषाध्यक्ष : इंजि.श्यामराव सावळे(हिंगोली), अंतर्गत तपासणीस : इंजि. भरत कानिंदे (परभणी), कार्यकारणी सदस्य : प्राचार्य इंजि.रेवत कुमार बोरकर (नागपूर), इंजि. अनिल खडसे (वर्धा), इंजि.सौ मीना मेश्राम (नागपूर), इंजि.किशोर सवाने (चंद्रपूर), इंजि.विजय मंगळे, (धुळे), इंजि. दादाराव वाकोडे (संभाजीनगर), इंजि. नवनाथ शिंदे (लातूर) यांची निवड करण्यात आली.

CHANGE IN NAME

My (old name) is **PADMAWAR RAJU** which now I am, changing as (new name) **RAJU KESHAV PADMAWAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
RAJU KESHAV PADMAWAR
R/o Ward no.3, Shivaji nagar At Post Islapur
Tq.Kinwat Dist.Nanded-431803
Mob.no. 9423614217

CHANGE IN NAME

My (old name) is **KESHAVRAO PADMAWAR** which now I am, changing as (new name) **KESHAV AMBADAS PADMAWAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
KESHAV AMBADAS PADMAWAR
R/o Ward no.3, Shivaji nagar At Post Islapur
Tq.Kinwat Dist.Nanded-431803
Mob.no. 9423614217

CHANGE IN NAME

My (old name) is **MALWATKAR GOVIND** which now I am, changing as (new name) **GOVIND GANPATRAO MALWATKAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
GOVIND GANPATRAO MALWATKAR
R/o Ganraj niwas Pundalikwadi
Mahavir Chowk Vazirabad Nanded-431601
Mob.no. 8788033022

नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१८१२/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.२३/११/२०२६

जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **श्री.रमेश पि.बालाजी खंडागळे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **५७७/१० गट क्र.५७७ मधील प्लॉट क्र.१०** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **श्री.निशिकांत पि.बंडाप्पा जडे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ५५९९/२०२६ दि.०१.०६.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.०९ आहे, पश्चिमेस :- प्लॉट क्र.११ आहे, उत्तरेस :- २५ फुट रुंद रस्ता, दक्षिणेस :- काझी अनिसोदीन यांचे शेत आहे.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत,अर्धापूर

नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१८१३/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.२३/११/२०२६

जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **श्री.नजीर खाजामिया खुरेशी खाटीक** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१०३१ गट क्र. मधील प्लॉट क्र.** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **श्री.शेख चाँदसाब शेख मौलासाब** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- शपथपत्र/संमतीपत्र, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- अरबी शाळा, पश्चिमेस :- स्वतःचे घर, उत्तरेस :- रस्ता, दक्षिणेस :- इब्राहीम कुरेशी

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत,अर्धापूर

नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१८११/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.२३/११/२०२६

जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **श्री.सोहेल अख्तर अब्दुल कदीर** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **८२५/४० गट क्र.८२५ मधील प्लॉट क्र.४०** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **श्री.शेख रहिम शेख बाबा मिया** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ५७८३/२०२६ दिनांक ०४.०६.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील अराफत कॉलनी नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.३९ आहे, पश्चिमेस :- प्लॉट क्र.४१ आहे, उत्तरेस :- २० फुट रुंद रस्ता, दक्षिणेस :- प्लॉट क्र.४५ आहे.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत,अर्धापूर

पुनर्वापरातील शेकडो टन दगडी कोळशाचा साठा;खुलेआम ट्रकमधून उतराई

प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परवानगीचा प्रश्न ऐरणीवर



नायगाव/प्रतिनिधी-राहेर येथे दगडी कोळशाच्या मोठ्या साठ्याचा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, येथे केवळ नवीन दगडी कोळसाच नव्हे, तर इतर ठिकाणी वापर झालेला आणि पुनर्वापरासाठी आणलेला दगडी कोळसाही शेकडो टनांच्या प्रमाणात एकाच ठिकाणी साठवून ठेवण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

ट्रकमधून मोठ्या प्रमाणात दगडी कोळसा आणून खुल्या जागेत उतरवला जात असल्याचे छायाचित्रातून दिसून येत आहे. या कोळशाचा वापर परिसरातील वीटभट्ट्यांमध्ये इंधन म्हणून केला जात असल्याची माहिती आहे. मात्र, वापर झालेल्या कोळशाची पुन्हा साठवणूक, खरेदी-विक्री आणि वाहतूक कोणत्या नियमांनुसार केली जात आहे, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.एवढ्या मोठ्या प्रमाणात पुनर्वापरातील दगडी कोळशाचा साठा एका ठिकाणी जमा होत असताना संबंधित विभागांकडे त्याची अधिकृत नोंद आहे का? महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची आवश्यक संमती घेतली आहे का? कोळशाचा स्रोत आणि वाहतुकीची कागदपत्रे वैध आहेत का? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.दगडी कोळशाच्या साठवणुकीमुळे परिसरातील धूळ आणि प्रदूषणाचा प्रश्नही निर्माण होऊ शकतो. त्यामुळे महसूल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि संबंधित यंत्रणांनी राहेर येथील कोळसा साठ्याची प्रत्यक्ष पाहणी करून त्याची वैधता तपासावी.राहेरमधील शेकडो टन पुनर्वापरातील दगडी कोळशाच्या साठ्यामागे नेमके कोण आहे? या साठ्याला अधिकृत परवानगी आहे की, संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष? याची चौकशी होणार का, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

एकनाथ शिंदे सोबत संपूर्ण पक्ष का गेला नाही?

कपिल सिब्बल यांचा सुप्रीम कोर्टात सवाल

नवी दिल्ली:शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण निवडणूक चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान ठाकरे गटाचे ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी शिंदे गटाचा युक्तिवाद खोडून काढत जोरदार बाजू मांडली. एकनाथ शिंदे म्हणजेच शिवसेना आणि संपूर्ण पक्ष शिंदे यांचाच आहे, तर मग संपूर्ण पक्ष त्यांच्यासोबत का गेला नाही? असा सवाल सिब्बल यांनी उपस्थित केला. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय खंडपीठासमोर आज हा युक्तिवाद झाला.

शिंदे गटाच्या वकिलांनी शिवसेना पक्षावर एकनाथ शिंदे यांचाच अधिकार असल्याचा दावा केला होता. त्याला प्रत्युत्तर देताना सिब्बल यांनी विधिमंडळातील बहुमत म्हणजे राजकीय पक्ष नव्हे, अशी भूमिका मांडली. विधानसभा अध्यक्षपदाच्या निवडणुकीत राजन साळवी आणि राहुल नार्वेकर यांच्यात झालेल्या लढतीचा संदर्भ देत शिंदे गटाच्या आमदारांनी



भाजपच्या पाठिंब्याच्या सरकारच्या बाजूने केलेल्या मतदानावरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. तत्कालीन प्रतोद सुनील प्रभू यांची नियुक्ती पक्षाने केली होती, याकडेही न्यायालयाचे लक्ष वेधले. आमदार अपात्रतेची याचिका योग्य वेळी दाखल करण्यात आली असून, आजही ती वैध आहे, असे सिब्बल यांनी स्पष्ट केले. विधानसभेची मुदत संपली म्हणून त्या काळातील अपात्रतेचा प्रश्न संपुष्टात येत नाही. शिंदे गटाचे आमदार अपात्र ठरल्यास निवडणूक आयोगाचा पक्ष आणि चिन्हा बाबतचा निर्णयही चुकीचा ठरू शकतो, असा युक्तिवाद त्यांनी केला. सुभाष देसाई प्रकरणाचा संदर्भ देत अपात्रतेच्या याचिकांवर विशिष्ट कालमर्यादेत निर्णय होणे अपेक्षित होते; मात्र तसे झाले नाही, असेही त्यांनी नमूद केले. निर्णयाला झालेल्या विलंबासाठी ठाकरे गटाला जबाबदार धरता येणार नाही, असे सांगताना आमदार अपात्रतेचा निर्णय या संपूर्ण प्रकरणासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. दहाव्या अनुसूचीचा मुख्य उद्देश राजकीय पक्षांमध्ये फूट पडू नये हा आहे. विधानसभा अध्यक्षांनी या अनुसूचीनुसार योग्य निर्णय घेतला आहे की नाही, याची तपासणी करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे, असा युक्तिवादही सिब्बल यांनी केला. त्यामुळे शिवसेनेच्या पक्षमालकीचा आणि धनुष्यबाण चिन्हाचा वाद आता कोणते वळण घेतो, याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

शासकीय कार्यालयांतील व्हॉट्सॲप वेबच्या वापराबाबत गृह मंत्रालयाचा सतर्कतेचा इशारा

नवी दिल्ली - शासकीय कार्यालयांमध्ये संगणकावरून व्हॉट्सप वेबचा वापर करताना अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन केंद्रीय गृह मंत्रालयाने केले आहे. व्हॉट्सप वेबच्या लॉगिन सत्राचा गैरवापर करून वापरकर्त्यांच्या खात्यांमध्ये अनधिकृत प्रवेश मिळविण्याचा धोका भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राच्या राष्ट्रीय सायबर गुन्हे धोका विश्लेषण विभागाने अधोरेखित केला आहे. या पार्श्वभूमीवर गृह मंत्रालयाने सायबर सुरक्षेबाबत सतर्कतेचा इशारा दिला आहे.

व्हॉट्सप वेबच्या लॉगिन सत्रावर सायबर गुन्हेगारांनी अनधिकृत ताबा मिळवल्यास संबंधित खात्यातील संदेश वाचणे, वापरकर्त्याच्या नावाने संदेश पाठविणे, संपर्क क्रमांक आणि ग्रुपमधील संभाषणांची माहिती मिळविणे शक्य होते. अशा प्रवेशाचा वापर करून शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांची ओळख धारण करणे, आर्थिक फसवणूक करणे, फिशिंगद्वारे माहिती मिळविणे तसेच अन्य सायबर गुन्हे घडविण्याचा धोका आहे.

शासकीय कामकाजाशी संबंधित कागदपत्रे, प्रशासकीय माहिती, आर्थिक व्यवहारांचा तपशील, गोपनीय पत्रव्यवहार आणि अन्य संवेदनशील माहितीची देवाणघेवाण व्हॉट्सप वेबद्वारे करू नये, असा स्पष्ट सल्ला देण्यात आला आहे. कार्यालयीन संगणकावर व्हॉट्सप वेबचे लॉगिन कायमस्वरूपी सुरू ठेवू नये. प्रत्येक वापरानंतर खात्यातून लॉगआऊट करणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक संगणक, सायबर कॅफे, हॉटेलमधील बिझनेस सेंटर किंवा अविश्वसनीय संगणकांवरून व्हॉट्सप वेब वापरणे टाळावे.

व्हॉट्सप खात्यावरून आपल्या नकळत संदेश पाठविले जाणे, संपर्क व्यक्तींकडून अनपेक्षित प्रतिसाद मिळणे किंवा खात्यात अन्य संशयास्पद हालचाली आढळणे, ही संभाव्य सायबर घुसखोरीची लक्षणे असू शकतात. त्यामुळे अशा बाबींकडे दुर्लक्ष न करता तातडीने आवश्यक खबरदारी घ्यावी. कार्यालयीन संगणकांची ऑपरेटिंग सिस्टिम, इंटरनेट ब्राउझर आणि सुरक्षा प्रणाली नियमितपणे अद्ययावत ठेवावी. अनोळखी फाइल्स, संशयास्पद डाउनलोड, क्रॅक सॉफ्टवेअर तसेच अविश्वसनीय स्रोतांमधून प्राप्त झालेल्या फाइल्स उघडू नयेत, असेही सूचित करण्यात आले आहे. शासकीय माहितीची गोपनीयता, कार्यालयीन पत्रव्यवहाराची सुरक्षितता आणि डिजिटल यंत्रणांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सायबर सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करावे आणि डिजिटल संवाद साधताना विशेष दक्षता बाळगावी, असे आवाहन केंद्रीय गृह मंत्रालयाने केले आहे.

ऐतिहासिक दस्ताऐवजाचे महत्व अधोरेखीत करणाऱ्या ग्रंथ प्रकाशन सोहळ्याचे गुरुवारी आयोजन



नांदेड/प्रतिनिधी- महार-मांग जातीतील अंतर्गत संघर्ष ऐतिहासिक दस्ताऐवजाचे महत्व अधोरेखीत करणारा ग्रंथ पुस्तकाचे प्रकाशन सोहळा गुरुवार दि.२६ नोव्हेंबर रोजी शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आला आहे.

महार-मांग जातीतील अंतर्गत संघर्ष व ऐतिहासिक दस्ताऐवज या पुस्तकाचे मुळ लेखन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे. ग्रंथाचे संकलन व संपादन डॉ.राजू सोनसळे व कपिल सरोदे यांनी केले आहे. या ग्रंथाचे प्रकाशन व उद्घाटक ज्येष्ठ पत्रकार रामप्रसाद खंडेलवाल यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला भदंत पय्याबोधी थेरो यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अर्धापूर येथील हुतात्मा गोविंदराव पानसरे महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सिद्धोधन कांबळे हे राहणार आहेत. या कार्यक्रमाला नगरसेवक राहुल सोनसळे, मास मुव्हमेंट प्रतीक मोरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पुस्तक प्रकाशन समारंभास नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

बंगारपल्ली दोस्तपल्ली येथे २९ नोव्हेंबर रोजी युवकांचा महामेळावा

देगलूर/प्रतिनिधी-जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या कृपाशीर्वादाने व परमपूज्य दादाश्री यांच्या प्रेरणेने उपपीठ तेलंगणा युवा सेना अंतर्गत भव्य युवा पर्व आनंदोत्सव पर्वणीचे आयोजन रविवार दि.२९ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे.ही पर्वणी उपपीठ तेलंगणा,बंगारपल्ली दोस्तपल्ली,मंडल जुक्कळ, जि. कामारेड्डी येथे सकाळी १०.३० ते सायं.६ वाजेपर्यंत मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी साडेदहा ते अकरा वाजता ध्वजसंचलन व ध्वजारोहणाने होणार आहे. शिस्तबद्ध ध्वजसंचलनात शेकडो युवक सहभागी होणार असून भगव्या ध्वजाच्या साक्षीने युवक एकतेचा व राष्ट्रभक्तीचा संदेश देणार आहेत.त्यानंतर स. ११.०० ते ११.३० वा. पादपूजन होणार आहे. मान्यवरांचे पादपूजन करून त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. गुरुंप्रती कृतज्ञता व आदर व्यक्त करण्याचा हा सोहळा असणार आहे. स. ११.३० ते १२.०० वा. सामुदायिक प्रार्थना व नित्यस्तोत्र पठण होणार आहे.सर्व युवक एकत्र येऊन सामुदायिक प्रार्थना करणार आहेत. यातून मनःशांती, एकता व सकारात्मक ऊर्जा मिळणार आहे. दुपारी बारा वाजता प्रमुख व्याख्यान होणार आहे. युवकांनो झेपावे क्षितिजाकडे या विषयावर प्रमुख व्याख्याते ॲड.संदीप महाराज तेलगावकर व ज. न. म प्रबोधनकार आनंदकुमार पांचाळ हे युवकांना मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. वादविवाद स्पर्धा होणार आहे.यातून युवकांचे वक्तृत्व, विचार मांडण्याची क्षमता, आत्मविश्वास व नेतृत्वगुण उजळून निघणार आहेत.स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. मी असा घडलो हे प्रेरणादायी सत्र होणार आहे. यात यशस्वी युवक, मान्यवर आपल्या जीवनातील अनुभव, संघर्ष, अपयशातून यशाकडे कसा प्रवास केला याची कहाणी सांगणार आहेत.यातून इतर युवकांना नक्कीच प्रेरणा मिळणार आहे. जगद्गुरुंशींची विविध कार्य यावर माहिती दिली जाणार आहे. जगद्गुरुंशींनी समाजासाठी केलेले धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक कार्य याची माहिती यावेळी दिली जाणार आहे. आम्ही पाईक जगद्गुरुंशींचे हा भक्तिमय कार्यक्रम होणार आहे.भजन, भक्तिगीते व घोषणांनी परिसर भक्तिमय होणार आहे. ध्वजावरोहणाने पर्वणीचा समारोप होणार आहे.या पर्वणीसाठी उपपीठ तेलंगणा युवा सेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व युवक यांनी गेल्या अनेक दिवसांपासून जय्यत तयारी केली आहे. गावागावात बैठका घेऊन युवकांना निमंत्रण देण्यात आले आहे.



सांगली येथे घेण्यात आलेल्या अश्वमेध वेट लिफ्टिंग स्पर्धेत नागवंत जयपाल पारडे चिखलीकर याने चौदा वर्षाखालील गटातून सुवर्णपदक पटकावल्याबद्दल येथील शासकीय विश्रामगृहात आंबेडकरवादी चळवळीचे ज्येष्ठ नेते सुरेश गायकवाड, पु.भन्ते पय्याबोधी थेरो, प्रफुल्ल सावंत, यांच्या प्रमुख उपस्थितीत शाल, पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी सुखदेव चिखलीकर, प्रा.राजू सोनसळे, रमेश गोडबोले, सुरेश हाटकर, स.रणजितसिंघ मन्नन, नंदकुमार बनसोडे, सुभाष काटकांबळे, मधुकर ढोले, विजू सरपाते, प्रकाश रोकडे, कोच शिरीष सुर्यवंशी, प्रकाश जोंधळे यांच्यासह इतर मान्यंवर उपस्थित होते.

महाराष्ट्र शासन

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर

कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण) नांदेड

पत्ता: **भगीरथनगर, नांदेड-४३१६०५**

ई-मेल : **eenidnnd@rediffmail.com**

ई निविदा सूचना **क्र.०४ सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण) नांदेड, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामा करिता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण) नांदेड. यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

अ.क्र	कामाचे नाव	जिल्हा	निविदेची अंदाजित किंमत (वस्तू व सेवा कर वगळून) रु.लक्ष
१	२	३	४
१	निम्न मानार प्रकल्प, ता. कंधार जि.नांदेड विश्रांतीगृहाच्या इमारतीचे बांधकाम करणे	नांदेड	४२४.७२

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक २५/११/२०२६ ते दिनांक ०२/१२/२०२६
ई-निविदा उघडण्याचा दिनांक : ०७/१२/२०२६ (शक्य असल्यास)

जा.क्र.नांपावि(द.) नां/लेखा-४/२५३७/२०२६ दिनांक:२०/११/२०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
नांदेड पाटबंधारे विभाग (द.) नांदेड

स्वाक्षरित/-
(श्री.प्र.थोरात)
कार्यकारी अभियंता
नांदेड पाटबंधारे विभाग (द.) नांदेड

पुरोगामी पत्रकार संघाच्या वतीने संविधान दिनाचे आयोजन

मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड तालुका पुरोगामी पत्रकार संघाच्या वतीने २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील ह्या उपस्थित राहणार असून तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी माणिक बेंद्रे, तहसीलदार आनंद देऊळगावकर, नायब तहसीलदार मारुती जगताप, कृषी अधिकारी डॉ.अमर ज्योती गच्चे, गटविकास अधिकारी शेखर देशमुख, गटशिक्षणाधिकारी सुरेश पाटील, मुख्याधिकारी शुभम वाठोरे, पोलीस निरीक्षक गणेश कराड, नगराध्यक्ष विश्रांतीताई कदम, माजी नगराध्यक्ष राम चौधरी, भाजपा तालुकाध्यक्ष दत्तू देशमुख, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन पुरोगामी पत्रकार संघाचे अध्यक्ष उत्तम हनुमंते यांनी केले आहे.

डॉ.मुकेश बंग यांना 'टॉर्चबियरर ऑफ होप' पुरस्कार



उमरखेड/प्रतिनिधी-उमरखेड येथील सुपुत्र आणि सध्या नागपूर येथे कन्सल्टंट मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट म्हणून कार्यरत असलेले कॅन्सर रोग तज्ञ डॉ. मुकेश बंग यांना अत्यंत प्रतिष्ठित आणि मानाचा समजला जाणारा टॉर्चबियरर ऑफ होप पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मुंबई येथे आयोजित 'युनाईट टू बीट कॅन्सर' या भव्य कार्यक्रमात हा सन्मान सोहळा पार पडला. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री माननीय श्रीमती मेघनाताई बोर्डिकर यांच्या हस्ते डॉ. बंग यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.कॅन्सर सारख्या दुर्धर आजाराशी झुंज देणाऱ्या हजारो रुग्णांना केवळ उपचारच नव्हे, तर जगण्याची नवी उमेद, नवी आशा देण्याचे कार्य डॉ. मुकेश बंग गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे करीत आहेत. रुग्णांशी आपुलकीने वागणे, अत्याधुनिक उपचार पद्धतींचा वापर आणि रुग्णांच्या मनातील भीती दूर करून त्यांना सकारात्मक ऊर्जा देणे, हीच त्यांच्या कार्याची ओळख बनली आहे.या कार्याची दखल घेत त्यांना 'टॉर्चबियरर ऑफ होप' म्हणजेच 'आशेचा मशालवाहक' या पुरस्काराने गौरविण्यात आले. हा पुरस्कार केवळ एका व्यक्तीचा नसून, कॅन्सरशी लढणाऱ्या प्रत्येक योद्ध्याच्या आशेचा सन्मान आहे.यावेळी वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर, कॅन्सर योद्धे मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी डॉ. बंग यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पान १ वरुन

कोर्टाबाहेर भरदिवसा गोळीबार...

संताप व्यक्त केला. विद्येचे माहेरघर, सांस्कृतिक राजधानी आणि सुरक्षित शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्याची ओळख आता गुन्हेगारी आणि दहशतीचे शहर अशी होत चालली आहे, ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याचे त्यांनी म्हटले. शहरातील ढासळलेली कायदा-सुव्यवस्था पूर्वपदावर आणण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली. न्याय मिळवण्यासाठी नागरिक ज्या न्यायालयात जातात, त्याच न्यायालयाच्या परिसरात हत्या घडल्याने पुण्यातील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आरोपींचा शोध घेण्यासोबतच न्यायालय परिसरातील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्याची गरज या घटनेमुळे अधोरेखित झाली आहे.

४२ लाख शेतकऱ्यांना मोफत...

देण्यात आली. ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धतीसंदर्भातील विधेयकाच्या प्रारूपालाही मंजुरी देण्यात आली.दरम्यान, नागपूर जिल्ह्यातील मौदा नगर पंचायतीच्या प्रशासकीय इमारतीसाठी शासकीय जमीन देण्याचा निर्णयही मंत्रिमंडळाने घेतला. या निर्णयांमुळे शेतकरी, विद्यार्थी, कर्मचारी आणि प्रशासकीय व्यवस्थेला विविध स्तरांवर दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा दर्जा आणि...

आंबेडकरांच्या विचारांचा वारसा सांगताना राजकीय भूमिकांमध्ये विसंगती दिसते. त्यामुळे पवार कुटुंबाच्या कोणत्याही आंदोलनावर किंवा भूमिकेवर विश्वास ठेवण्यापूर्वी जनतेने विचार करावा.रोहित पवार सध्या राजकारणात स्वतःची जागा निर्माण करण्यासाठी सनसनाटी निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या राजकीय भूमिकेचे खरे स्वरूप पुढील काळात स्पष्ट होईल, असेही हाके यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या राजकारणात बदलती समीकरणे, सत्तेसाठी होणाऱ्या जवळिकी आणि परस्परविरोधी राजकीय भूमिका यामुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याचे सांगत हाके यांनी राज्यातील राजकीय संस्कृतीच्या घसरत्या स्तरावर चिंता व्यक्त केली.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४